जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- ३०५ दिनांक :-३०/१०/२०२१

## ऑनलाईन गुंतवणूक करणाऱ्या नागरिकांची ॲपद्वारे फसवणुक करणा-या गुन्हेगारांस अटक/ सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी.

एस.एम.एस., व्हॉटसअप ग्रुपव्दारे सामान्य नागरिकांना वेगवेगळे गुंतवणूकीचे प्लॅन दाखवून ऑनलाईन रक्कम स्विकारुन फसवणूक झालेबाबत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. I ११६३/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी), ६६ (डी) अन्वये नोंद करण्यात आला होता.

सायबर गुन्हे कक्षाने नमुद गुन्हयात तांत्रीक तपास करुन गुंतवणूक दारांकडून रक्कम स्विकारणारे वेगवेगळ्या बँकखात्यांपैकी आय.सी.आय.सी.आय. बँकखाते धारक नामे– १) **धर्मेंद गोविंद सिंग उर्फ प्रकाश, वय ३६ वर्षे, पत्ता - डोंबिवली (पुर्व), ता.कल्याण, जिल्हा-ठाणे, २) शिवचरण पुरषोत्तम यादव, वय – ४१ वर्षे, रा.कळंबोली, जिल्हा रायगड व ३) चंद्रशेखर सिंहासन यादव, वय – ३९ वर्षे, रा.कळंबोली, जिल्हा रायगड.** यांना ताब्यात घेवुन चौकशी केली असता नमुद संशयित इसमांचा गुन्ह्यात सहभाग असल्याबाबत पुरावा उपलब्ध झाल्याने सदर आरोपीत यांना तुळींज पोलीस ठाणेकडे सुपुर्द करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

खालील नमुद लिंकद्वारे फसवणुक झाली असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा तुळींज पोलीस ठाणेस संपर्क साधावा.

1. https://tigerfund.net
2. https://vipshop.app/#/new-recharge
3. https://indiamart7.com
4. https://down.oubleq.live/DOUBLE-Q

**पोलीस निरीक्षक/ श्री.राजेंद्र कांबळे, प्रभारी अधिकारी, तुळींज पोस्टे मो.नं–९८७०१७८४३८**

**पोलीस निरीक्षक/ श्री. श्याम आपेट (तपासी अधिकारी), मो.नं–९८५०८९४८२५**

**तुळींज पोलीस ठाणे ईमेल आयडी - pi.tulinj.mb-vv@mahapolice.gov.in**

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. प्रविण स्वामी, पो.उप.निरी. संतोष भिसे, प्रसाद शेनोलकर, पो.शि. प्रविण आव्हाड, गणेश इलग, माधुरी धिंडे, पल्लवी निकम, सुवर्णा माळी नेम - सायबर गुन्हे कक्ष तसेच पो.ना.काळे,पो.शि. /सुशिलकुमार पवार नेम - मध्यवर्ती गुन्हे शाखा यांनी केली.

-------oooooo---------